
## संक्षिप्त वृत्त



पंढरपूर : स्वातंत्र्यदिनानिमित्त देशभरात आनंदाचे वातावरण असताना पांडुरंगाला तिरंगाचा पोशाख परिधान करण्यात आले.

### पंढरपूरच्या श्री विठू माऊली व रुक्मिणी मातेला तिरंगा पोशाख

✔ **पंढरपूर** : स्वातंत्र्यदिनानिमित्त देशभरात आनंदाचे वातावरण असताना पंढरीचा राजा विठ्ठलाला देखील तिरंगाचा पोशाख परिधान करण्यात आला. विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात हिरवा, पांढरा आणि केशरी या तीन रंगाच्या फुलांची आकर्षक अशी सजावट केली. यासाठी झेंडू, तुळस आणि गुलछडी या पाना-फुलांचा वापर करण्यात आला आहे. तिरंग्याची सजावट केल्याने विठ्ठल मंदिरात भक्तिमय वातावरणाबरोबरच देशभक्तीचे देखील वातावरण तयार झाले. विठ्ठल मंदिरातील देवांच्या प्रवेशद्वारावर प्रवेशद्वार, चौखांबी, सोळखांबीसह मंदिरात फुलांनी सजावट केली आहे. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने विठ्ठलाला खास तिरंग्याचा पोषाख देखील परिधान करण्यात आला आहे. हिरव्या रंगाचे धोतर आणि केशरी रंगाचा अंगरखा आणि गळ्यात पांढरे उपरणे असा तिरंगी पोषाख केला आहे. तिरंगी पोशाखामुळे विठ्ठलाची मूर्ती अधिकच खुलून दिसत होती. विठ्ठलाचे हे तिरंग्यात नटलेले रूप पाहण्यासाठी भाविकांनी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती.

---



**अक्कलकोट : डीवायएसपी भोसले यांचा श्री स्वामी समर्थ मंदिरात सत्कार करताना महेश इंगळे, प्रथमेश इतर.**

### मध्य रेल्वेच्या डीवायएसपी भोसलेंनी घेतले स्वामी समर्थांचे दर्शन

✔ **अक्कलकोट** : महाराष्ट्र मध्य रेल्वे विभागाचे पोलीस उपअधीक्षक (डीवायएसपी) चंद्रकांत भोसले यांनी नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास सहकुटुंब भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्यावतीने समितीचे चेअरमन नगरसेवक महेश इंगळे यांनी डीवायएसपी चंद्रकांत भोसले यांचा स्वामींचे कृपावस्त्र देऊन वटवृक्ष मंदिरात यथोचित सन्मान केला. यावेळी डीवायएसपी चंद्रकांत भोसले यांनी मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्यामुळे आमच्या भोसले कुटुंबीयांचे स्वामी दर्शन अत्यंत सुलभतेने व प्रसन्न भावमुद्रेने स्वामी दर्शन घडले, त्याबद्दल महेश इंगळे यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत. महेश इंगळे यांचे स्वामी सेवाकार्य हे असेच अखंडितपणे घडत राहो व त्यांच्या पुढाकाराने जास्तीत जास्त स्वामी भक्तांना सुलभतेने स्वामींचे दर्शन घेण्याची संधी लाभावी, अशी स्वामी समर्थांच्या चरणी प्रार्थना करून महेश इंगळे यांच्या सेवाकार्यास शुभेच्छा व्यक्त केल्या. याप्रसंगी प्रथमेश इंगळे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी व भोसले कुटुंबीय उपस्थित होते.

---

### पंढरपूर तहसील कार्यालयात ध्वजारोहण कार्यक्रम उत्साहात

✔ **पंढरपूर** : स्वातंत्र्याच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त



तहसील कार्यालय येथे प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजारोहणाचा शासकीय कार्यक्रम झाला. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसीलदार सचिन लंगुटे, अप्पर तहसीलदार तुषार शिंदे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, नायब तहसीलदार विजय कुमार जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, महिला बालविकास प्रकल्प अधिकारी समाधान नागणे यांच्यासह स्वातंत्र्यसैनिक, मान्यवर नागरिक, पदाधिकारी तसेच अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पंढरपूर पोलीस पथकाच्यावतीने मानवंदना देण्यात आली.

---

### सेंट जॉन्स इंग्लिश स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात

✔ **वेळापूर** : दि. १५ ऑगस्ट रोजी सेंट जॉन्स इंग्लिश मीडियम स्कूल वेळापूर येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका मिस शीजी जॉर्ज यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी शिक्षकवृंद, सर्व विद्यार्थी, पालक वर्ग उपस्थित होते. याप्रसंगी शाळेमध्ये विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. नृत्य, नाटके, भाषणे, देशभक्तीपर गीते इत्यादींचे सादरीकरण करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका मिस शीजी जॉर्ज यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

**नोकरीविषयक**

**नामांकित कंपनीत फुलटाईम/पार्ट टाईम** मुले-मुली, महिला पाहिजेत. पगार ६ ते १५ हजार. शिक्षणाची अट नाही. पत्ता : नवीन बस स्टँडसमोर, अकलूज. मो. ७३५०६३६९६२, ९१५८७७०१६७ (२८८२४)

अस्सल सोलापुरी सुराज्य सोलापूर

Classified

**निवेदन :** या अंकात प्रसिध्द झालेल्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आवाहनाच्या सत्यतेबाबत 'सुराज्य' हमी घेऊ शकत नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

# एकरुख उपसा सिंचन योजनेत मंगळवारपासून पाणी सोडणार

## ▶▶ आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या पाठपुराव्याने येणार पाणी; अनेक गावांना मोठा लाभ; पाणी टंचाईपासून दिलासा

✔ अक्कलकोट/प्रतिनिधी

**चालू वर्षाच्या पावसाळ्यात उजनी धरणाचा पाणीसाठा शंभर टक्केच्या वर झाल्याने आणि उजनी खालील लाभक्षेत्रात या वर्षाचा पावसाळा अत्यंत तोकडा झाल्याने उजनी भरल्यानंतर भीमा नदीत पाणी सोडले जाते त्याऐवजी जिथे पाणी टंचाई आहे, त्या भागातील शेतीला आणि नागरिकांना पाणी मिळावे यासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पुढाकाराने बैठक पार पडले आणि मंगळवार दि. २० ऑगस्टपासून बोरी मध्यम प्रकल्प एकरूप उपसा सिंचन योजनेत पाणी सोडण्याचा निर्णय झाला. या निर्णयाने अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर भागातील अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाच्या अनेक गावांना मोठा लाभ होऊन पाणी टंचाईपासून दिलासा मिळण्यास मदत होणार आहे.**




**अक्कलकोट : एकरुख योजनेतून पाणी सोडण्याबाबत जिल्हाधिकारी सोबत चर्चा करताना आ. सचिन कल्याणशेट्टी.**

मागील वर्षी उजनीत कमी पाणीसाठा असल्याने बोरी मध्यम प्रकल्प एकरूप उपसा सिंचन योजनेत पाणी सोडता आले नाही त्याचवेळी पुढील वर्षी योजने शंभर टक्के भरल्यानंतर पाणी सोडण्याचा नियोजन करण्यात आला होता. यावर्षी मागील आठवड्यात उजनी धरण शंभर टक्के भरल्यानंतर सतत पाठपुरावा करून त्या अनुषंगाने बैठक होऊन मंगळवार दि. २० ऑगस्टपासून पाणी सोडण्यास प्रारंभ होणार आहे. कमी पावसाळ्याने पाणीटंचाईच्या झळा तीव्र होत असताना सदर दोन्ही योजनेत पाणी सोडल्याने या भागातील शेतकरी आणि नागरिक यांच्या पाणीटंचाईची अडचण दूर होणार आहे.

**- आ. सचिन कल्याणशेट्टी, अक्कलकोट.**

याबाबत सविस्तर माहिती अशी की, ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीसच आमदार कल्याणशेट्टी यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन पाणी सोडण्याबाबत मागणी केली होती. परंतु कालव्यामध्ये साचलेलं मोठ्या प्रमाणात गाळ, वाढलेले झाडेझुडपे, त्याला पडलेल्या प्रचंड भेगा, त्यात साचलेला गाळ या सर्व अडथळ्याने तिथे पाणी सोडता आले नाही. गेल्या पंधरा दिवसात सातत्याने प्रयत्न करून त्या कालव्यातील सर्व कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. त्यामुळे असलेली सर्व अडथळे आता दूर झालेले आहेत. त्यामुळे पाणी सोडण्याचा निर्णय झालेला असून सोडलेले पाणी कुरनूर धरणापर्यंत पूर्ण क्षमतेने आणि वेगाने येण्यास मदत होणार आहे.

उजनी प्रकल्पात पूर्ण क्षमतेने पाणीसाठा झालेला असून नदीद्वारे व कालव्याद्वारे विसर्ग सुरु करण्यात आलेला आहे. सदरचे पुराचे पाणी वापरून बोरी मध्यम प्रकल्प व एकरुख उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रातील इतर तलावात सोडण्याची मागणी आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे केलेली होती. सदर मागणीस अनुसरून दि. १७ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली. सदरच्या बैठकीत दि. २० ऑगस्टपासून एकरुख उपसा सिंचन योजना कार्यान्वित करणेबाबत जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी सहमती दर्शवली आहे. जलसंपदा विभागाकडून कारंबा शाखा कालव्यातील गाळ काढण्याचे काम तसेच कारंबा पंपगृह व एकरुख उपसा सिंचन योजनेच्या हगलूर पंपगृह व बोरामणी पंप गृहातील यांत्रिकी व विद्युत विभागाची सर्व कामे पूर्ण झाल्याची माहिती यावेळी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

एकरुख उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रातील बोरी मध्यम प्रकल्प, दर्गनहळ्ळी, कर्देहळ्ळी, रामपूर व आवश्यकतेनुसार अन्य लगतच्या तलावात पाणी सोडण्याबाबतचा निर्णय सदर बैठकीत घेण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीस आ. सचिन कल्याणशेट्टी, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता ज्ञानदेव बागडे, धीरज साळे महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, कार्यकारी अभियंता धनंजय कोंडेकर, मोहन जाधवर व अन्य अधिकारी उपस्थित होते.

---

# एक कॉल, प्रॉब्लेम सॉल्व्ह! समस्या निवारणाचा 'सावंत पॅटर्न'

## विद्यार्थ्यांच्या सोयींसाठी बस सेवा सुरु

✔ परंडा/प्रतिनिधी

तालुक्यातील पाचपिंपळा येथील काही विद्यार्थिनींनी महाराष्ट्र राज्याचे आरोग्यमंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. तानाजी सावंत यांच्याकडे महाविद्यालयात जाण्यासाठी बस उपलब्ध नसल्याचे गावभेट दौऱ्यादरम्यान सांगितले व त्यावर तात्काळ कार्यवाही म्हणून प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना फोन लावून २४ तासाच्या आत विद्यार्थ्यांच्या सोयींसाठी, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी वेळेत बस उपलब्ध व्हावी याकरिता फोन केला व दुसऱ्याच दिवशी विद्यार्थ्यांसाठी बस पाचपिंपळा या गावात हजर झाली.

या बस सेवेमुळे पंचक्रोशीतील पाच ते सहा गावातील विद्यार्थ्यांना तालुक्याच्या ठिकाणी शाळा व महाविद्यालयात जाण्यासाठी बसची सुविधा उपलब्ध झाली असल्याने विद्यार्थी, पालकांमध्ये व ग्रामस्थांमध्ये आनंदाचे



वातावरण आहे. यामुळे तानाजी सावंत यांच्या कार्यतत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

---



पंढरपूर : नागपंचमी व रक्षाबंधनानिमित्त सुप्रसिध्द निवेदिका मोनिका जाजू यांच्या निवेदनाखाली खेळ पैठणीचा कार्यक्रम.

## विठ्ठल प्रतिष्ठानतर्फे सुस्तेत 'खेळ पैठणी'चा

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत आबा पाटील यांच्या संकल्पनेतून विठ्ठल प्रतिष्ठान यांच्यावतीने नागपंचमी व रक्षाबंधनानिमित्त सुप्रसिध्द निवेदिका मोनिका जाजू यांच्या निवेदनाखाली खेळ पैठणीचा कार्यक्रम सुस्ते येथे उत्साहात संपन्न झाला.

दैनंदिन जीवनात व्यस्त असलेल्या महिलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचा हेतुने कार्यक्रम घेत आहे. महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांनाही आनंदाचे क्षण वेचता यावेत याच अनुषंगाने खेळ पैठणीचा कार्यक्रम घेत असल्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले. सदर कार्यक्रमामध्ये विजयी झालेल्या महिलांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांना पारितोषिकांचे वाटप करण्यात आले.

यावेळी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक रामदास बापू चव्हाण, पांडुरंग कदम, बाळासाहेब सालविठ्ठल, अनिल काका घाडगे, सरपंच विशाल कसबे, दिलीप दाजी रणदिवे, समाधान चव्हाण, उपसरपंच स्नेहा बोबडे, ग्रामपंचायत सदस्य राणी चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य मनीषा कोळी, ग्रामपंचायत सदस्य विष्णू तात्या गावडे, राजेंद्र बोबडे, विठ्ठल कारखान्याचे संचालक विठ्ठल रणदिवे, परमेश्वर कांबळे, अजित मुलाणी, शरद लोकरे, अंनता चव्हाण, कुमार वाघमोडे, अर्चना चव्हाण, सारिका चव्हाण तसेच या कार्यक्रमासाठी अथक परिश्रम घेतलेले डीव्हीपी पीपल बँकेचे संचालक अनिल यादव, तानाजी सालविठ्ठल, शंकर सुर्वे, तुषार बोबडे, नितीन गावडे, महेश सालविठ्ठल, संतोष साठे, पंकज चव्हाण, बालाजी फुगारे, विशाल फरतडे, श्रीनिवास चव्हाण, अविनाश नागटिळक आदी मान्यवर उपस्थित होते.

---

## मैंदर्गी शाळेत स्वातंत्र्य दिनानिमित्त प्रभात फेरी व वृक्षारोपण

✔ अक्कलकोट /प्रतिनिधी

मैंदर्गी कन्नड मुलींच्या शाळेत वृक्षारोपण व स्वातंत्र्य दिनानिमित्त प्रभात फेरी काढण्यात आली. यावेळी मुलींने हर घर तिरंगा घर घर तिरंगा या घोषवाक्य देत, हातात तिरंगा झेंडा घेऊन बगी घोडा गाडीत भारत माता महात्मा गांधीजी यांचा वेशभूषा परिधान करून मुलींनी घोडा गाडीत सवारी झाले होते.स्पीकर चा आवाजात देशभक्ती गीत लावून गावातील सर्व ठिकाणी ध्वजारोहण करून शेवटी शाळेत ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनील बंडगर,(सेवा कार्यकारी सोसायटी सदस्य मैंदर्गी) यांचे प्रमुख उपस्थिती होते. सुनील बंडगर यांनी शाळेला मुलींचा मध्यानभोजनासाठी १०१ ताठ सप्रेम भेट म्हणून दिले व तसेच प्रधान दोन वृक्ष संरक्षण जाळी दिले तसेच शरणप्पा सलगरे, श्रीमहांतेश सिन्नुर, विजयकुमार आरेनवरू, मल्लय्या नंदीकोल, युवा नेते महेश शावरी या सर्वांनी एक एक तसेच मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टीमनी यांनी त्यांचे वडिलांचे स्मरणार्थ तीन जाळी असे एकूण १५ जाळे सर्वाकडून मिळून देण्यात आले.




**अक्कलकोट** : हातात तिरंगा झेंडा घेऊन बगी घोडा गाडीत वेशभूषा परिधान करून मुलींनी घोडा गाडीत सवारी झाले.

---

## भाविकांसाठी न्यासाचे पुढील मास्टर प्लान सुनियोजित : कुलकर्णी

✔ अक्कलकोट/प्रतिनिधी

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अखंडपणे सुरू असलेले अन्नदान सेवा, नियोजित महाप्रसाद गृह, पार्किंगची व्यवस्था आणि येणाऱ्या भाविकांसाठी न्यासाचे पुढील मास्टर प्लान देखील अतिशय सुनियोजित असल्याचे मनोगत सोलापूर ग्रामीणचे नूतन पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता, मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, चिदानंद उपद्य, पीएसआय खापरे हे उपस्थित होते.

यावेळी न्यासाचे सचिव शामराव मोरे, विश्वस्त संतोष भोसले, मनोज निकम, निखील पाटील, गोटू माने, प्रवीण घाडगे, एस. के. स्वामी, सिध्दाराम कल्याणी, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, अभियंता अमित थोरात, बाळासाहेब पोळ, सुरज सावंत, दत्ता माने, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.



**अक्कलकोट : अमोलराजे भोसले यांच्या हस्ते ग्रामीणचे नूतन पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांचा श्रींची मूर्ती, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात आला, त्यांच्या समवेत उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, चिदानंद उपाध्ये, पीएसआय खापरे उपस्थित होते.**

---

# पंतांना अभिवादन करण्यासाठी जनसागर लोटला

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

**स्व. सुधाकरपंत परिचारक यांच्या चतुर्थ पुण्यतिथीनिमित्त वाखरी येथील श्री सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या वाखरी येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक स्मृतीस्थळ वाखरी येथे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातून आणि पंढरपूर शहरातून जनसागर लोटलेले चित्र पहावयास मिळाले. पंतांना अभिवादन करण्यासाठी जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून जनसागर एकवटला होता.**

काहीतरी राजकीय घोषणा येणाऱ्या विधानसभेच्या बाबतीत परिचारक कुटुंबाकडून होईल, या अपेक्षांनी अनेक परिचारक प्रेमी कार्यकर्ते कार्यक्रमस्थळी उपस्थित होते. परंतु कार्यक्रमात कुठलीही राजकीय विषयाची साधी चर्चा देखील झाली नाही त्यामुळे कार्यकर्त्यांचा अपेक्षाभंग झाला. हजारोंच्या संख्येने परिचारक प्रेमी कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक स्मृतिस्थळ वाखरी येथे हजर होते.

पंढरपूर मतदार संघाचे सतत २५ वर्षे नेतृत्व केलेले एसटी महामंडळाचे माजी अध्यक्ष स्व. सुधाकरपंत परिचारक पुण्यतिथीनिमित्त आदरांजली वाहण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पुण्यतिथीनिमित्त कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक स्मृतीस्थळ वाखरी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात रक्तदात्यांनी मोठ्या प्रमाणावर रक्तदान केले. या कार्यक्रमाप्रसंगी मान्यवरांनी आदरांजलीपर मनोगते व्यक्त केली. याप्रसंगी नामवंत कीर्तनकार हभप जगताप महाराज यांचे प्रबोधनकार कीर्तन पार पडले. दुपारी १२:३० ला पुष्पांजली अर्पण करून सुधाकरपंत परिचारक यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यानंतर सर्वांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.



**पंढरपूर** : एसटी महामंडळाचे माजी अध्यक्ष स्व. सुधाकरपंत परिचारक यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुष्पांजली अर्पण करून आदरांजली वाहताना माजी आमदार प्रशांत परिचारक.